CNR : MHAH180038622025

| | | | |
|---|---|---|---|
| दाखल दिनांक | १४/१०/२०२५ | | |
| नोंदणी दिनांक | १४/१०/२०२५ | | |
| निकाल दिनांक | १०/०६/२०२६ | | |
| कालावधी | वर्ष | महिने | दिवस |
| | ०० | ०७ | २७ |

# दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, ता. राहुरी, जि. अहमदनगर यांच्या न्यायालयात

( पिठासन अधिकारी: मयुर ए. पवार )

**विवाह अर्ज क्र. १२७/२०२५** **निशाणी क्र. १२**

१. [redacted]
वय : ३० वर्षे, धंदा : नोकरी
रा. राहुरी खुर्द, ता. राहुरी,
जि. अहमदनगर.

२. [redacted]
वय : १९ वर्षे, धंदा : घरकाम
द्वारा : [redacted]
मु.पा. संक्रापूर, ता. राहुरी,
जि. अहमदनगर. ...**अर्जदार.**

**...विरुध्द...**

**कोणी नाही** ...**सामनेवाला**

---

**प्रकरण:** हिंदू विवाह अधिनियम, १९५५ चे कलम १३(ब) अन्वये.

---

अर्जदार क्र. १ व २ तर्फे विधिज्ञ :– श्री. ए. के. डोखे

सामनेवाला तर्फे विधिज्ञ :– कोणीही नाही

---

**–: न्यायनिर्णय :–**

(उदघोषित दिनांक १०/०६/२०२६)

१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज हिंदू विवाह अधिनियम, १९५५ चे कलम १३(ब) अन्वये विवाह विच्छेदनासाठी दाखल केला आहे.

**अर्जदारांचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे:–**

२. अर्जदार क्र. १ व २ हे पती–पत्नी असुन त्यांचा विवाह दिनांक ०२/०१/२०२४ रोजी श्रीदत्त लॉन्स, श्रीरामपूर रोड, राहुरी फॅक्टरी, ता. राहुरी, जि.अहमदनगर येथे पार पडला. लग्नानंतर अर्जदार क्र. २ ही अर्जदार क्र. १ यांच्याकडे नांदण्यास आल्यानंतर सुरुवातीचे ४–५ महिने त्यांनी एकत्रात ब–यापैकी संसार केला. सदर विवाह संबंधातुन अर्जदार क्र. १ व २ यांना कोणतेही अपत्य झालेले नाही. त्यानंतर त्यांच्या आवडी–निवडी, आचार–विचारांध्ये भिन्नता असल्यामुळे मतभेद होऊन आपसात वाद होऊ लागले. अर्जदार क्र. १ व २ यांच्यात भांडण होऊन वादविवाद होऊ लागले. अर्जदार क्र. १ व २ हे दि. ०२/०६/२०२४ पासुन एकमेकांपासुन विभक्त राहत आहेत. त्यानंतर अर्जदार क्र. १ व २ यांच्या नातेवाईकांनी अनेक बैठका घेऊन त्यांनी एकत्र संसार करण्यासाठी त्यांची समजुत काढण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यांना यश आले नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ व २ यांनी एकमेकांच्या संमतीने घटस्फोट घेऊन वैवाहिक सबंध कायमस्वरुपी संपुष्टात आणण्याचे ठरविलेले आहे. अर्जदार क्र. १ यांनी अर्जदार क्र. २ हिस तिच्या भविष्यासाठी व अर्जदार नं. २ हिच्या मागील व पुढील पोटगीची एकुण रक्कम रुपये १,५०,०००/– (अक्षरी रुपये एक लाख पन्नास हजार मात्र) देण्याचे ठरले आहे. अर्जदार क्र. १ व २ यांची संसारऊपयोगी साहित्य, दागदागिने, कपडालत्ता याबाबत कोणतीही एकमेकांविरुध्द तक्रार राहिलेली नाही. तसेच अर्जदार क्र. १ यांनी अर्जदार क्र. २ व त्याच्या कुटुंबियांच्या स्थावर व जंगम मालमत्तेतील सर्व हक्कम व अधिकार कायमस्वरुपी सोडून देण्याचे व भविष्यात कोणत्याही प्रकारची मागणी किंवा तक्रार न करण्याचे मान्य केले आहे.

३. अर्ज दाखल झाल्यानंतर उभयतांना पुन्हा विचार करण्याची तसेच समोपचाराने वाद मिटवण्याची संधी देण्यात आली. दोन्ही पक्षकारांमध्ये मध्यस्थी घडवून आणण्यासाठी मध्यस्थ केंद्र, राहुरी यांचेकडे प्रकरण सोपवले असता सदर प्रकरणामध्ये समझोता झाला नाही.

४. माझ्या विचारार्थ खालील मुद्दे निघाले असून त्यावरील निष्कर्ष हे खालीलप्रमाणे कारणमिमांसेसह नमूद केलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हिंदू विवाह अधिनियम, १९५५ चे कलम १३ (ब) प्रमाणे विवाह विच्छेदनास पात्र आहेत काय ? | होय. |
| २. | आदेश व हुकूमनामा ? | अर्ज मंजूर केला. |

## कारणमिमांसा

५. प्रस्तुत अर्जाच्या समर्थनार्थ अर्जदार क्र. १ व अर्जदार क्र. २ यांनी अनुक्रमे निशाणी क्र. ९ व १० वर सरतपासाचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. अर्जदार क्र. १ व २ यांनी निशाणी क्र. ११ वर पुरसीस दाखल करून तोंडी पुरावा बंद केला आहे.

६. प्रस्तुत अर्जासाठी अर्जदारांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

### मुद्दे क्र. १ व २ करिता :-

७. अर्जदार क्र.१ व अर्जदार क्र.२ यांनी शपथपत्रात नमूद केले आहे की, त्यांचा विवाह दि.०२/०१/२०२४ रोजी झालेला आहे. सदर विवाह संबंधातून त्यांना कोणतेही अपत्य झालेले नाही. विवाहानंतर त्यांच्यामध्ये मतभेद निर्माण होऊन वाद होऊ लागले. सबब, दिनांक ०२/०६/२०२४ पासून एकमेकांपासुन विभक्त राहत आहेत. भविष्यामध्ये एकत्र राहणे शक्य नसल्याने त्यांनी आपसात संमतीने विवाह विच्छेदन होऊन मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ यांनी अर्जदार क्र. २ हिला पोटगी व नुकसान भरपाईपोटी रक्कम रु. १,५०,०००/- देण्याचे ठरले होते व सदर रक्कम अर्जदार क्र.२ यांना मिळालेली आहे. त्यामुळे अर्जदार क्र.२ यांनी अर्जदार क्र.१ यांच्या स्थावर व जंगम मालमत्तेवरील सर्व हक्क व अधिकार कायमचे सोडून दिलेले असून भविष्यात त्यांना ते मागण्याचा हक्क व अधिकार नाही. तसेच त्यांच्यामध्ये संसारऊपयोगी साहित्य, दागदागिने, कपडालत्ता याबाबत कोणतीही एकमेकांविरुध्द तक्रार राहिलेली नसून त्यांनी एकमेकांविरूध्द दिलेल्या सर्व तक्रारी सोडून दिलेल्या

आहेत. अर्जाची पाहणी केली असता उभयतांमध्ये समोपचाराने वाद मिटून पुन्हा संसाराकरिता एकत्र येण्याची कोणतीही शक्यता नसल्यामुळे त्यांनी परस्पर संमतीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्याचे त्यांच्या शपथेवरील साक्षीद्वारे सिध्द होते.

८. अर्जदारांचे विवाहानंतर निर्माण झालेले नातेसंबंध तथा त्यातून निर्माण झालेले हक्क व अधिकार याबाबतचे वाद अर्जदारांनी आपसात मिटवलेले आहेत. अशा परिस्थितीमध्ये अर्जदारांचा विवाह परस्पर संमतीने विच्छेदित करण्यास नाकारण्याचे कोणतेही कारण नाही. सबब, अर्जदार क्र.१ व २ हे हिंदू विवाह अधिनियम, १९५५ चे कलम १३ (ब) प्रमाणे विवाह विच्छेदनास पात्र असल्याचे निर्विवाद सिध्द होत आहे. सबब, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत असून मुद्दा क्र.२ च्या उत्तरासाठी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे :-

## **आदेश**

१) प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२) अर्जदार क्र.१ [redacted] व अर्जदार क्र.२ [redacted] यांचा दि. ०२/०१/२०२४ रोजी झालेला विवाह हिंदू विवाह अधिनियम, १९५५ चे कलम १३ (ब) प्रमाणे प्रस्तुत आदेशापासून संपुष्टात आला असे जाहीर करण्यात येत आहे.

३) आदेशाप्रमाणे संमतीच्या घटस्फोटाचा हुकूमनामा करण्यात यावा.

४) अर्जदारांना हुकूमनाम्याची प्रत मोफत द्यावी.

MAYUR EKNATHRAO PAWAR

Digitally signed by MAYUR EKNATHRAO PAWAR
Date: 2026.06.10 15:18:49 +0530

**( मयुर ए. पवार )**

दिनांक:-१०/०६/२०२६.

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
ता. राहुरी, जि. अहमदनगर.